# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १३/०६/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

### फसवणुक

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंर्तगत येथे दिनांक २७/०५/२२ चे १५.०० वा. ते दिनांक ०३/०६/२२ चे ११.१२ वा. दरम्यान फिर्यादीला मोबाईल वर सांगितल्याप्रमाणे आरोपी क्र. १. आकाश वर्मा सिओ, २. राजेश बालाजी (लकी ड्रॉ कंपनी मॅनेजर) दोन्ही राहणार दस्तगीर पेठ रघुनाथपुर अमरावती यांनी संगनमत करून संगणक साधन मार्गाचा वापर करून फिर्यादी नामे– वासुदेव गणपत जातगडे, वय ३९ वर्ष रा. सावंगा ता जि. नागपूर याच्या पत्नीच्या व्हाट्सअँप वर २५,००,०००/–रू. चा लकी ड्रॉ आलेला आहे. अशी बातवनी करून व त्याद्वारे तोतयेगिरी करून फिर्यादी कडून वेगवेगळे खाते क्रमांक व युपीआय कोड वर ऑनलाईन पद्धतीने लकी ड्रॉ चे कोणते ही पैसे न देता फिर्यादी कडून टप्प्या–टप्प्याने २,८४,२८०/–रू. घेऊन फिर्यादीचे फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ३४ भादंवि. सह कलम ६६ ड माहीती तंत्रज्ञान अधिनियत २००० अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री आचरेकर मो.नं. ८३८००७२२११ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील धीरज अलायविल कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक १२/०६/२२ चे १३.५० वा. ते १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– योगीराज जालंदर रॉय, वय ४५ वर्ष, रा. इंडोरामा गेट क्र. १, क्वॉटर नं., डब्ल्यु २२ यांनी सांगीतले की, एमएच–४०/बीव्ही– ८१०१ क्रमांकाचा मोटार सायकलचा चालक आरोपी नामे– श्रावण रामाजी घुगरे(मृतक), वय ४८ वर्ष, रा. वार्ड क्र.०१ बुटीबोरी हिंगणा एमआयडीसी बोरी हा भारकस कडुन गार्डन चौकाकडे येत असतांना त्याने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडवर स्लिप होवुन खाली पडला. त्यास डोक्याला मार लागल्याने तो स्वताचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री रामेश्वर राय मो.नं. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

<u>अकस्मात मृत्यू</u>

<u>१) पो.स्टे. कुही</u>:— अंतर्गत ०५ कि. मी. मौजा सालई येथे **मनोहर महादेव मांढरे (मृतक), वय ५७ वर्ष, रा. सालई ता. उमरेड** याला बरेच दिवसा पासुन काविळ व हर्निया हा रोग असल्यामुळे तो त्रस्त होता. त्याचा रोग दिवसेनीदिवस वाढत गेल्याने त्याने सदर त्रासाला कंटाळुन दि. १२/०६/२२ चे सकाळी ०४.०० वा. सुमारास गावातील विहीरीच्या पाण्यांत उडी घेवुन तो मृत अवस्थेत आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सोनबा महादेव मांढरे, वय ५० वर्ष, रा. सालई ता. उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार क्रिष्णा घुटके मो.क्र. ७३५०८३६३३४ हे करीत आहे.

<u>२) पो.स्टे. वेलतुर :</u>— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा रेंगातूर शेत शिवार येथे दिनांक ०९/०६/२०२२ चे १२.०० ते १३.०० वा. **अजय भगवान मंगर(मृतक), वय २२ वर्ष रा.रेंगातूर.ता.कूही जि. नागपूर** याने अज्ञात कारणातुन त्याचे राहते घरी विशारी औषध प्राशन केले. त्यास उपचारकरिता प्रथम ग्रामीण रूग्णालय कुही व त्यानंतर मेडिकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला. मेडिकल पोलीस बूथ नागपूर येथून प्राप्त कागदपत्रावरून सदर मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— भगवान मोहन मंगर वय ४५ वर्ष रा.रेंगातूर.ता.कूही.जि.नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार क्रिष्णा घुटके मो.क्र. ७३५०८३६३३४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर